Wildlife Conservation Trust, Mumbai

# वन्यजीव अपराध प्रतिबंधन पुस्तिका

## Notes on Wildlife Crime Prevention

Edited by Kiran Rahalkar, 2020

# वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ परिचय

वन्यजीवनाशी संबंधित कायदे हे **वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२** पारित करण्यापूर्वीपासूनच भारतीय इतिहासाचा एक भाग आहेत. निसर्गातील अत्यंत महत्त्वपूर्ण परिसंस्थेला पूर्ववत करण्यासाठी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टिने आपल्या वन्यजीवनाचे संरक्षण करण्याची गरज निर्माण झालेली आहे. याकडे जर वेळीच लक्ष दिले नाही, तर ह्याच्या वाढत्या ऱ्हासामुळे प्रलयसदृश स्थिती निर्माण होईल, ज्याचा विपरित परिणाम निसर्गावर आणि पर्यायाने मानवावर होईल. वन्य प्राण्यांच्या संरक्षणावर भर देणासंबंधीचा संदर्भ पहायचा, तर कौटिल्याचे "अर्थशास्त्र" हा बहुधा सर्वात जुना संदर्भ म्हणता येईल, ज्यात वनरक्षक रक्षण करीत असलेली वने हत्तींसाठी निर्माण करणे हे राजाचे कर्तव्य आहे, असे सांगितले आहे. परंतु वन्यजीवनाचे आणि निसर्गाचे संरक्षण करण्यासाठीचा सर्वात जुना कायदेशीर संदर्भ आपल्याला इसवीसनापूर्वी ३ऱ्या शतकात आढळून येतो, जेव्हा मगध राज्याच्या सम्राट अशोकाने वन्यजीवन आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी कायदा बनविला होता.

सम्राट अशोकाने इसवीसनापूर्वी ३ऱ्या शतकात उभारलेल्या ५व्या स्तंभावर असे लिहून ठेवलेले आहे:

'माझ्या राज्याभिषेकानंतर २६ वर्षांनी विविध प्रकारचे प्राणी संरक्षित म्हणून घोषित करण्यात आले होते - पोपट, मैना, अरुणा, राजहंस, जंगली बदके, नंदीमुख, गेलाट, वटवाघळे, राणीमुंग्या, अस्थिविरहित मासे, वेदारेयक, गंगापुपूतक, संकिया, मासे, कासवे, साळिंदर, खारी, हरणे, बैल, ओकापिंड, जंगली गाढवे, जंगली कबुतरे, घरगुती कबुतरे आणि सर्व चतुष्पाद प्राणी, जे उपयुक्तही नाहीत किंवा त्यांचे मांसही खाल्ले जात नाही. लहान शेळ्या-मेंढ्या, डुकरिणी, ज्या लहान असतील किंवा त्यांच्या पिल्लांना दूध देत असतील त्या संरक्षित आहेत, त्याचप्रमाणे सहा महिन्यांपेक्षा लहान वयाची पिल्लेही संरक्षित आहेत. कोंबड्यांचे खच्चीकरण करायचे नसते, तुसात लपलेल्या जिवांना जाळून टाकायचे नसते आणि जंगलांना विनाकारण किंवा प्राण्यांना मारून टाकण्यासाठी आग लावायची नसते. एक प्राणी दुसऱ्याची भूक भागविण्यासाठी नसतो.'

वन्यजीवनाच्या रक्षणासाठी पहिला संहिताकृत कायदा ब्रिटिशांनी १८८७मध्ये केला, ज्यांनी जंगली पक्षी संरक्षण अधिनियम, १८८७ पारित केला. ब्रिटिश सरकारने ह्या कायद्याचा

उपयोग ज्या पक्ष्यांना त्यांच्या विणीच्या हंगामात पकडले जात असेल किंवा मारले जात असेल, त्यांना बाळगण्यास आणि त्यांची विक्री करण्यास मनाई करणाऱ्या नियमांमध्ये सुसूत्रीकरण आणण्यासाठी केला. १९१२ साली ब्रिटिशांनी पुन्हा एकदा जंगली पक्षी आणि प्राणी संरक्षण अधिनियम, १९१२ ह्या नावाचा कायदा पारित केला, जो कालांतराने जंगली पक्ष्यांचे आणि प्राण्यांचे संरक्षण करण्यास अपुरा पडू लागला. १९३५ साली ह्या १९१२ सालच्या कायद्यात सुधारणा करून जंगली पक्षी आणि प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम, १९३५ पारित केला. याव्यतिरिक्त काही राज्यांनी विशिष्ट प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी अन्य काही कायदे पारित केले, जे असे होते:

- मद्रास जंगली हत्ती संरक्षण अधिनियम, १८७३
- हत्ती संरक्षण अधिनियम, १८७९
- म्हैसूर शिकारीसाठी मारले जाणारे प्राणी (गेम्स) आणि मासे संरक्षण विनियम, १९०१
- बंगाल गेंडा संरक्षण अधिनियम, १९३२.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वन्यजीवनामध्ये वेगाने होणारा ऱ्हास ही भारतामध्ये चिंतेची बाब बनून राहिली. चित्त्यासारखे काही जंगली प्राणी नामशेष होण्याच्या मार्गावर होते . ज्या क्षेत्रात एकेकाळी वन्यजीवनाचा सुकाळ होता, ती आता मात्र ओसाड पडू लागली होती. अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने जंगली प्राण्यांच्या सुरक्षित अस्तित्वासाठी आवश्यक ते संरक्षण पुरवू शकली नाहीत. जंगली पक्षी आणि प्राणी संरक्षण अधिनियम, १९१२ पूर्णत: कालबाह्य झालेला होता. अस्तित्वात असलेल्या राज्यांच्या कायद्यांमध्ये शिक्षेची तरतूद होती, जी गुन्ह्याच्या आणि जंगली प्राण्यांची शिकार करून त्यातून मिळणाऱ्या आर्थिक लाभांच्या प्रमाणात नव्हती. शिवाय, कायद्यांमध्ये फक्त शिकारीवर नियंत्रण ठेवण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले होते आणि प्राणीचर्म आणि वन्यजीवनाचा आणि त्यापासून मिळणाऱ्या उत्पादनांचा व्यापार यांसारख्या वन्यजीवनाच्या ऱ्हासास कारणीभूत असणाऱ्या महत्त्वाच्या घटकांवर भर देण्यात आला नव्हता.

राज्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या स्थानिक तरतुदींचा विचार करून केंद्र सरकार अशा निष्कर्षापर्यंत पोहोचले की ह्या तरतुदी पुरेशाही नव्हत्या आणि समाधानकारकही नव्हत्या.

म्हणून एक सर्वसमावेशक कायदा करण्याची आवश्यकता होती, ज्यामुळे वन्यजीवनाला आणि त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक आणि प्रासंगिक सर्व बाबींना संरक्षण प्राप्त होईल. उपरोक्त विषयावर राज्यघटनेतील सातव्या परिशिष्टातील राज्यांच्या अखत्यारीतील २०व्या सूचीच्या अनुषंगाने असा काही कायदा, म्हणजेच वन्य प्राणी आणि पक्षी संरक्षण कायदा पारित करण्यास केंद्र सरकार असमर्थ होते. ह्या विषयावर आवश्यक तो कायदा पारित करण्यासाठी दोन किंवा त्यापेक्षा अधिक राज्यांच्या विधिमंडळांनी घटनेतील २५२व्या कलमाच्या अनुषंगाने संसदेला अधिकार दिल्याशिवाय राज्यांना कायदा लागू करण्याचे अधिकार संसदेला नव्हते (घटनेतील २४९ आणि २५० मधील तरतुदी वगळून) आंध्र प्रदेश, बिहार, गुजरात, हरियाणा, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, मणिपूर, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल ह्या राज्यांच्या विधिमंडळांनी असा ठराव पारित केला आणि १९७२ मध्ये असे विधेयक संसदेत मांडण्यात आले.ह्या विधेयकातील महत्त्वाचे मुद्दे असे होते:

(a) प्रत्येक राज्यासाठी वन्यजीवन सल्लागार मंडळाची स्थापना करणे;

(b) जंगली प्राण्यांच्या (पक्ष्यांसहित) शिकारीचे नियमन करणे;

(c) काही क्षेत्रांना अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, इत्यादी घोषित करण्यासाठी प्रक्रिया निश्चित करणे;

(d) वन्य प्राणी, प्राण्यांपासून बनवलेल्या वस्तू आणि ट्रॉफी किंवा प्राणीचर्म बाळगणे, प्राप्त करणे किंवा हस्तांतरित करणे किंवा त्यांचा व्यापार करणे ह्याचे नियमन करणे;

(e) ह्या कायद्याचे उल्लंघन केल्यास शिक्षेची तरतूद करणे

तपशीलवार विचारविनिमयानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहांनी वन्य जीव (संरक्षण) विधेयक संमत केले, त्याला ९ सप्टेंबर १९७२ रोजी राष्ट्रपतींची संमती मिळाली. कायद्याच्या पुस्तकांमध्ये ते वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२चा ५३) म्हणून समाविष्ट करण्यात आले. त्यानंतर लगेचच वन आणि वन्य प्राण्यांशी संबंधित बाब राज्यघटनेच्या सामायिक यादीत (कॉंकरंट लिस्ट III) अनुक्रमे अनुक्रमांक १७ए आणि १७बीमध्ये देण्यात आलेली आहे. (४२वी घटनादुरुस्ती) कायदा, १९७६.

आजपर्यंत वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२चा ५३) मध्ये सहा वेळा पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली

1. वन्य जीव (संरक्षण) (सुधारणा) अधिनियम, १९८२ (१९८२चा २३)

2. वन्य जीव (संरक्षण) (सुधारणा) अधिनियम, १९८६ (१९८६चा २८)

3. वन्य जीव (संरक्षण) (सुधारणा) अधिनियम, १९९१ (१९९१चा ४४)

4. वन्य जीव (संरक्षण) (सुधारणा) अधिनियम, १९९३ (१९९३चा २६)

5. वन्य जीव (संरक्षण) (सुधारणा) अधिनियम, २००२ (२००३चा १६)

6. वन्य जीव (संरक्षण) (सुधारणा) अधिनियम, २००६ (२००६चा ३९)

आज रोजीनुसार ८ कलमे रद्दबादल ठरवल्यानंतर ह्या कायद्यात एकूण १३९ कलमे आहेत, जी १३ प्रकरणांमध्ये विभागलेली आहेत. ह्याचे प्रकरण-निहाय तपशील खाली दिलेले आहेत.

प्रकरण 1 - प्राथमिक - २ विभाग

प्रकरण 2 - ह्या कायद्यांतर्गत नियुक्त करावयाची किंवा स्थापन करावयाची प्राधिकरणे - ९ विभाग

प्रकरण 3 - वन्य प्राण्यांची शिकार - 3 विभाग (6 विभाग रद्द केले)

प्रकरण 3A -विनिर्दिष्ट वनस्पतींचे संरक्षण - 8 विभाग

प्रकरण 4 - संरक्षित क्षेत्रे - 30 विभाग (2 विभाग रद्द केले)

प्रकरण 4A - मध्यवर्ती प्राणीसंग्रहालय प्राधिकरण आणि प्राणीसंग्रहालयांची पुनर्रचना - 10 विभाग

प्रकरण 4B - राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण - 14 विभाग

प्रकरण 4C - वाघ आणि अन्य धोक्यात असलेल्या प्रजाती गुन्हे नियंत्रण मंडळ - 2 विभाग

प्रकरण 5 - वन्य प्राण्यांचा, प्राणीजन्य वस्तूंचा, ट्रॉफीचा व्यापार किंवा वाणिज्य - 13 विभाग

प्रकरण 5A - विशिष्ट प्राण्यांपासून बनविलेले ट्रॉफी, प्राणीजन्य वस्तू, इत्यादींच्या व्यापारावर किंवा वाणिज्यावर प्रतिबंध - 3 विभाग

प्रकरण 6 - गुह्यांना प्रतिबंध आणि त्यांना शोध - 10 विभाग

प्रकरण 6A - बेकायदेशीर शिकार आणि व्यापार यांपासून मिळविलेल्या मालमत्तेची जप्ती - 25 विभाग

प्रकरण 7 - संकीर्ण - 10 विभाग

ह्या कायद्याच्या कलम 61च्या अंतर्गत परिशिष्टांच्या सूचीमध्ये कोणत्याही वनस्पतींच्या किंवा प्राण्यांच्या प्रजातींच्या आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट करण्याचे अधिकार केंद्र सरकारकडे आहेत. केंद्र सरकारने परिशिष्ट यादी आजपर्यंत ११ वेळा खालीलप्रमाणे बदललेली आहे:

1. J 11012/31/76-FRY(WL) दिनांक २९ ऑगस्ट १९७७.
2. J 11012/31/76-FRY(WL) दिनांक ५ ऑक्टोबर १९७७.
3. 1-28/78-FRY(WL) दिनांक ९ सप्टेंबर १९८०.
4. S.O. 859 (E) दिनांक २४ नोव्हेंबर १९८६.
5. S.O. 474 (E) दिनांक २८ मे २००१.
6. S.O. 665(E) दिनांक ११ जुलै २००१.
7. S.O. 1197(E) दिनांक ५ डिसेंबर २००१.
8. S.O. 233(E) दिनांक १९ फेब्रुवारी २००२.
9. S.O. 1085(E) दिनांक ३० सप्टेंबर २००२.
10. S.O. 2293(E) दिनांक ४ सप्टेंबर २००९.
11. S.O. 3653 (E) दिनांक ६ डिसेंबर २०१३.

# वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, 1972

**(क्र.53 सन 1972)**

वन्य प्राणी, पक्षी आणि वृक्ष या सर्व विषयांशी निगडित असलेल्या बाबींचा विचार करून देशाच्या परिस्थितीकीय व पर्यावरण सुरक्षिततेसाठीचा अधिनियम.

**प्रकरण 1**

प्रारंभिक

1. **संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ -**

(1). या अधिनियमास वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ असे म्हणता येईल

(2). हा अधिनियम संपूर्ण भारतात लागू आहे.

(3). हा अधिनियम कोणत्याही राज्यात, केंद्रशासित प्रदेशात लागू करायचा असल्यास, त्याप्रसंगी केंद्र शासन या संबंधीची सूचना प्रसिद्ध करेल व त्या अधिनियमातील वेगवेगळ्या तरतुदी वेगवेगळ्या तारखांना अंमलात येतील अशा स्वरूपाची अधिसूचना प्रसिद्ध करू शकेल

2. **व्याख्या - या अधिनियमाविषयी किंवा संदर्भात**

1) 'प्राणी' यात सस्तन प्राणी, पक्षी, सरपटणारे प्राणी, उभयचर, मासे, इतर कणा असलेले व कणा नसलेले व त्यांची पिले व अंडी.

2) 'प्राण्याच्या वस्तू' म्हणजे वस्तू जी कोणत्याही बंधक किंवा वन्य प्राण्यापासून, उपद्रवकारक प्राणी वगळता, बनवली असेल, व ती बनवताना अशा प्राण्याच्या पूर्णत: अथवा कोणत्याही भागाचा वापर केला असेल (व आयात केलेल्या हस्तिदंताचा वापर केला असेल अथवा उपयोग केला असेल).

5) 'बंधक प्राणी' म्हणजे कोणताही प्राणी, जो अनुसूची I, II, III, किंवा IV मध्ये निर्दिष्ट केला आहे, जो बंदिवासात आहे किंवा ठेवलेला आहे किंवा बंदिवासात जन्मलेला आहे.

15) 'अधिवास' यात कोणत्याही,जमिन, पाणी अथवा झाडे झुडुपे, ज्यात वन्य प्राण्यांची नैसर्गिक राहणी आहे याचा समावेश होतो;

16) 'शिकार' यात या शब्दाचे व्याकरणदृष्ट्या जे फेरफार आहेत आणि बव्हंशी सारखे जे शब्दप्रयोग आहेत त्याचा समावेश करून

(a) ठार करणे, विष देणे, कुठल्याही वन्य अथवा बंधक प्राण्याला आणि अशी कृती करण्याचा प्रत्येक प्रयत्न करणे;

(b) पकडणे, पाठलाग करणे, सापळा लावणे, जाळी लावणे, हाकलवणे अथवा गळ लावणे आमिष दाखवणे, कुठल्याही वन्य अथवा बंधक प्राण्याला आणि अशी कृती करण्याचा प्रत्येक प्रयत्न करणे;

(c) अश्या प्राण्याला दुखापत करणे, नाश करणे अथवा शरीराचा कोणताही भाग घेणे, अथवा सरपटणारे प्राणी, पक्षी यांच्या अंड्यांचा नाश करणे, घरटी मोडणे, त्रास देणे.

17) 'जमिन' यात नाला, कालवा, खाडी, आणि इतर जलप्रवाह, नद्या, ओढे, तलाव, नैसर्गिक किंवा कृत्रिम, (दलदल, पाणथळ जमिनी, दगड, गोटे यांचा समावेश).

20) 'मांस' यात कोणताही बंधक किंवा वन्य प्राणी, उपद्रवकारक प्राणी वगळता, याचे रक्त, हाडे, स्नायू, अंडी, कवच, चरबी, मांस कातडी सहित अथवा वगळता, कच्चे अथवा शिजवलेले, समावेश होतो.

24A) 'संरक्षित क्षेत्र' म्हणजे राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य, कॉन्झरवेशन रिझर्व,कम्युनिटी रिझर्व, कलम 18, 35, 36 A, आणि 36 C मध्ये नमूद केल्यानुसार;

27) 'विनिर्दिष्ट वनस्पती' म्हणजे अनुसूची VI मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वनस्पती

31) 'मृगयाचिन्ह' म्हणजे कोणताही बंधक किंवा वन्य प्राणी, उपद्रवकारक प्राणी वगळता, प्राण्याचा संपूर्ण किंवा काही भाग, जो सांभाळ करून ठेवला आहे, जतन केला आहे, नैसर्गिक किंवा कृत्रिम रीतीने, ज्यात:

(a) केसाळ कातडी, कातडी, संपूर्ण, किंवा काही भागात जतन केलेले प्राणी, अथवा टॅक्सीडर्मीच्या कृतीने जतन करणे, आणि

(b) श्रृंग, हाडे, कवच,शिंपले,शिंग,गेंड्याचे शिंग,केस, पिसे, नखे, दात,सुळे,कस्तुरी,अंडी, घरटी, आणि मधमाश्यांचे पोळे.

32) 'कच्ची मृगयाचिन्हे' म्हणजे कोणताही बंधक किंवा वन्य प्राणी, उपद्रवकारक प्राणी वगळता, प्राण्याचा संपूर्ण किंवा काही भाग, टॅक्सीडर्मीच्या कृतीने जतन करण्याच्या प्रक्रियेतून अथवा तत्सम प्रक्रियेतून गेलेला नाही, (ज्यात नुकत्याच मारलेल्या वन्य प्राण्याचा कस्तुरी, अंबर ग्रीस व इतर प्रणीजन्य पदार्थांचा समावेश आहे).

33) 'वाहन' म्हणजे जमिनीवर, पाण्यावर अथवा हवेत परिवहनासाठी वापरण्यात येणारे साधन ज्यामध्ये घोडा, बैल, म्हैस, रेडा, हत्ती, गाढव, उंट, खेचर इ. चा समावेश होतो.

34) 'उपद्रवकारक प्राणी' (व्हर्मिन) म्हणजे अनुसूची V मध्ये विनिर्दिष्ट केलेले प्राणी

35) 'हत्यार' ज्यामध्ये दारूगोळा, धनुष्यबाण, स्फोटक पदार्थ, अग्निशस्त्रे, आकडे, सुरी, जाळी, विष, सापळा, पिंजरे, असे साधन ज्याने भूल देता येईल, नक्कल करता येईल, नाश करता येईल, ठार करता येईल.

36) 'वन्य प्राणी' म्हणजे अनुसूची I ते IV मध्ये विनिर्दिष्ट केलेले प्राणी, ज्यांचा स्वभाव जंगली (नैसर्गिक) आहे.

37)'वन्यजीव' म्हणजे कुठलाही प्राणी, जलीय अथवा जमिनीवरच्या वनस्पती ज्या अधिवासाचा भाग आहेत.

| Various Types of Offences under the Wild Life (Protection) Act, 1972 that can occur within PA | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वन्य जीव (संरक्षण) अधिनियम,१९७२ अंतर्गत विविध प्रकारचे गुन्हे जे संरक्षित क्षेत्रात घडू शकतात | | | | | | | |
| Sr. No. | गुन्ह्याचा तपशील | खालील परिक्षेत्रात गुन्हा घडल्यास सदर कलमाचे उल्लंघन होते. | | | | शिक्षेचा तपशील कलम 51(1) प्रमाणे | गुन्ह्याचा प्रकार कलम 54 प्रमाणे |
| | | वन्यजीव अभयारण्य | राष्ट्रीय उद्यान | कॉन्झरवेशन रिझर्व | कॉम्मुनिटी रिझर्व | | |
| 1 | वन्यजीव अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यानात स्वसंरक्षणा खेरीज अथवा विनापरवानगी वन्यप्राण्यांची शिकार करणे. | 9 | 9 | X | X | कमीत कमी ३ वर्षे कारावास व कमीत कमी ₹ १०,००० दंड. | अतडजोड पात्र Non compoundable |
| 2 | अनाधिकृत प्रवेश वर्जीत | 27 (1) | 35 (8) सहीत 27(1) वाचा | X | X | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |

| Sr. No. | गुन्ह्याचा तपशील | वन्यजीव अभयारण्य | राष्ट्रीय उद्यान | कॉन्झरवेशन रिझर्व | कॉम्मुनिटी रिझर्व | शिक्षेचा तपशील कलम 51(1) प्रमाणे | गुन्ह्याचा प्रकार कलम 54 प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | **(वन्यजीव अभयारण्य/राष्ट्रीय उदयान यात व्यक्तीच्या वास्त्याव्याविषयी.)** गुन्हेगारीला प्रतिबंध न करणे. | 27 (2) Cl. a | 35 (8) सहीत 27 (2) Cl. A वाचा | 36 A (2) सहीत 27 (2) Cl. A वाचा | 36 C (2) सहीत 27 (2) Cl. Aवाचा | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 4 | **(वन्यजीव अभयारण्य/राष्ट्रीय उदयान यात व्यक्तीच्या वास्त्याव्याविषयी.)** गुन्हेगारास शोधून काढण्यास अथवा पकडण्यास मदत न करणे. | 27 (2) Cl. b | 35 (8) सहीत 27 (2) Cl. B वाचा | 36 A (2) सहीत 27 (2) Cl. B वाचा | 36 C (2) सहीत 27 (2) Cl. B वाचा | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 5 | **(वन्यजीव अभयारण्य/राष्ट्रीय उदयान यात व्यक्तीच्या वास्त्याव्याविषयी.)** वन्य प्राण्याचा मृत्यू झाल्याची माहिती प्राधिकृत अधिकाऱ्याला न देणे, वन्य प्राण्याच्या अवशेषांचे रक्षण न करणे. [FG,RO,RFO,ACF,DCF, DFO,APCCF] | 27 (2) Cl. c | 35 (8) सहीत 27 (2) Cl. C वाचा | 36 A (2) सहीत 27 (2) Cl. C वाचा | 36 C (2) सहीत 27 (2) Cl. C वाचा | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |

| Sr. No. | गुन्ह्याचा तपशील | वन्यजीव अभयारण्य | राष्ट्रीय उद्यान | कॉन्झरवेशन रिझर्व | कॉम्मुनिटी रिझर्व | शिक्षेचा तपशील कलम 51(1) प्रमाणे | गुन्ह्याचा प्रकार कलम 54 प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | **(वन्यजीव अभयारण्य/राष्ट्रीय उदयान यात व्यक्तीच्या वास्त्याव्याविषयी.)** त्याला माहित असलेल्या वणव्याची/आगीची माहिती न देणे, ती विजवण्याचा प्रयत्न न करणे. | 27 (2) Cl. d | 35 (8) सहीत 27 (2) Cl. D वाचा | 36 A (2) सहीत 27 (2) Cl. D वाचा | 36 C (2) सहीत 27 (2) Cl. D वाचा | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 7 | **(वन्यजीव अभयारण्य/राष्ट्रीय उदयान यात व्यक्तीच्या वास्त्याव्याविषयी.)** वन अधिकारी व पोलीस अधिकारी यांना गुन्हे तपासणी व प्रतिबंध प्रक्रियेत सहकार्य न करणे. | 27 (2) Cl. e | 35 (8) सहीत 27 (2) Cl. E वाचा | 36 A (2) सहीत 27 (2) Cl. E वाचा | 36 C (2) सहीत 27 (2) Cl. E वाचा | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 8 | वाईट हेतूने अथवा चुकीच्या मार्गाने हद्दीला नुकसान पोहोचवणे, ती पुसून टाकणे. | 27 (3) | 35 (5) | 36 A (2) (2) सहीत 27 (3) वाचा | 36 C (2) (2) सहीत 27 (3) वाचा | कमीत कमी ३ वर्षे कारावास व कमीत कमी ₹ १०,००० दंड. | अतडजोड पात्र Non compoundable |

| Sr. No. | गुन्ह्याचा तपशील | वन्यजीव अभयारण्य | राष्ट्रीय उद्यान | कॉन्झरवेशन रिझर्व | कॉम्मुनिटी रिझर्व | शिक्षेचा तपशील कलम 51(1) प्रमाणे | गुन्ह्याचा प्रकार कलम 54 प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | वन्य प्राण्याला दुखावणे, त्रास देणे, इतरत्र कचरा करणे. | 27 (4) | 35 (8) सहीत 27 (4) वाचा | 36 A (2) (2) सहीत 27 (4) वाचा | 36 C (2) (2) सहीत 27 (4) वाचा | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 10 | परवानगी शिवाय संशोधन, शास्त्रोक्त अभ्यास, फोटोग्राफी, पर्यटन, वैध व्यापार करणे. | 28 | 35 (8) सहीत 28 वाचा | X | X | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 11 | चीफ वाइल्ड लाईफ वार्डन च्या परवानगीशिवाय वनउपज व वन्यजीवांचा नाश करणे, गैर लाभ उठवणे, उच्चाटन करणे. | 29 | 35 (6) | X | X | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 12 | चीफ वाइल्ड लाईफ वार्डन च्या परवानगीशिवाय वन्य प्राण्याचा निवासाचा नाश करणे, हिरावून घेणे, परावृत्त करणे. | 29 | 35 (6) | X | X | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |

| Sr. No. | गुन्ह्याचा तपशील | वन्यजीव अभयारण्य | राष्ट्रीय उद्यान | कॉन्झरवेशन रिझर्व | कॉम्मुनिटी रिझर्व | शिक्षेचा तपशील कलम 51(1) प्रमाणे | गुन्ह्याचा प्रकार कलम 54 प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | चीफ वाइल्ड लाईफ वार्डन च्या परवानगीशिवाय पाण्याचा प्रवाह वळवणे, अडवणे, प्रवाह कमी-जास्त करणे. | 29 | 35 (6) | X | X | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 14 | संरक्षित क्षेत्रात विस्तव/आग पेटवणे, जळत ठेवणे, वन्यजीवांचा धोका निर्माण करणे. | 30 | 35 (8) सहीत 30 वाचा | 36A (2)सहीत 30 वाचा | 36C (2) सहीत 30 वाचा | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 15 | चीफ वाइल्ड लाईफ वार्डन/ प्राधीकृत अधिकारीच्या लेखी परवानगीशिवाय शस्त्र बाळगणे. [APPCF(WL),FD(TR),CCF,DCF, DFO,DD(TR),SDFO(INDEPENDENT SUB-DIVISION),ACF] | 31 | 35 (8) सहीत 31 वाचा | X | X | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 16 | वन्यप्राणी जीवनास धोका/ अपाय निर्माण होईल असे रसायन, स्फोटके, बाळगणे व वापर. | 32 | 35 (8) सहीत 32 वाचा | 36A (2) सहीत 32 वाचा | 36C (2) सहीत 32 वाचा | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |

| Sr. No. | गुन्ह्याचा तपशील | वन्यजीव अभयारण्य | राष्ट्रीय उद्यान | कॉन्झरवेशन रिझर्व | कॉम्मुनिटी रिझर्व | शिक्षेचा तपशील कलम 51(1) प्रमाणे | गुन्ह्याचा प्रकार कलम 54 प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 17 | विना परवानगी गुरांना चरण्यास व वावर करण्यास संरक्षित क्षेत्रात सोडणे. | 33 (d) | 35 (8)(7) (संपूर्णतःच राईबंदी) | X | X | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 18 | लसीकरण न केलेली जनावरे चरावायास नेणे | 33A (2) | 35 (8), सहीत 33A (2) वाचा (संपूर्णतः चराईबंदी) | X | X | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 19 | वनक्षेत्राच्या १० किमी परिघाच्या आत परावानाधक शस्त्रांची नोंद वनखात्याकडे न करणे | 34 | 35 (8), सहीत 34 वाचा | X | X | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 20 | शस्त्रास्त्रे अधिनियम,१९५९ (५४/१९५९) च्या अन्वये वनक्षेत्राच्या १० किमी परिघाच्या आत चीफ वाइल्ड लाइफ वार्डन च्या संमतीखेरीज परवाना देणे | 34 | 35 (8), सहीत 34 वाचार | X | X | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |

जर अपराध (क्र. 1-18) हे टायगर रिझर्वच्या कोअर क्षेत्रात (वन्यजीव अभयारण्य/ राष्ट्रीय उद्यान) घडले असतील अथवा टायगर रिझर्वच्या सीमाकनाशी संबंधीत असतील तर प्रथम वेळेस शिक्षेचे स्वरूप कमीतकमी ३ वर्ष कारावास जे ७ वर्षा पर्यन्त वाढू शकेल आणि कमीतकमी ₹ 50 हजार दंड जो ₹ 2 लाखपर्यन्त वाढू शकेल. अपराधाची पुनरावृत्ती केल्यास दोषी व्यक्तीस कमीतकमी 7 वर्ष कारावास आणि कमीतकमी ₹ 5 लाख ते ₹ 50 लाख पर्यन्त दंड होऊ शकेल.

| Various Types of Offences under the Wild Life (Protection) Act, 1972 that can occur outside PA | | | | |
|---|---|---|---|---|
| वन्य जीव (संरक्षण) अधिनियम,१९७२ अंतर्गत विविध प्रकारचे गुन्हे जे संरक्षित क्षेत्राच्या बाहेर घडू शकतात | | | | |
| Sr. No. | गुन्ह्याचा तपशील | सदर कलमाचे उल्लंघन होते | शिक्षेचा तपशील कलम 51(1) प्रमाणे | गुन्ह्याचा प्रकार कलम 54 प्रमाणे |
| 1 | स्वसंरक्षणा खेरीज शेडूल I व शेडूल II मधील भाग २ यात नमूद केलेल्या वन्य/बंदिस्त प्राण्याची विनापरवानगी शिकार करणे. | 9 | कमीत कमी ३ वर्षे कारावास व कमीत कमी ₹१०,००० दंड. | अतडजोड पात्र Non compoundable |
| 2 | स्वसंरक्षणा खेरीज शेडूल I व शेडूल II मधील भाग २ यात नमूद केलेल्या वन्य/बंदिस्त प्राण्यानव्यतिरिक्त इतर प्राण्यांची विनापरवानगी शिकार करणे. | 9 | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 3 | जाणूनबुजून, मुद्दाम, अधिसूचित केलेल्या वनस्पती परवानगीशिवाय उपटणे, गोळा करणे, नाश करणे. | 17A (a) | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 4 | अधिसूचित केलेल्या वनस्पती (जिवंत अथवा मृत) बाळगणे, विकणे, त्याचे तयार पदार्थ, विकण्यास देऊ करणे, वाहतूक करणे. | 17A (b) | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹२५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |

| Sr. No. | गुन्ह्याचा तपशील | सदर कलमाचे उल्लंघन होते | शिक्षेचा तपशील कलम 51(1) प्रमाणे | गुन्ह्याचा प्रकार कलम 54 प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| 5 | परवान्याशिवाय अधिसूचित केलेल्या वनस्पती व रोपांची लागवड करणे. | 17C (1) | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 6 | हस्तिदंत व हस्तीदंती वस्तू यांची आयात | 39 (1) (c) | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 7 | कोणत्याही रीतीने प्राप्त झालेली शासकीय मालमत्ता ४८ तासांच्या आत नजीकच्या पोलीस अथवा वन अधिकाऱ्याच्या ताब्यात न देणे | 39 (2) | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 8 | कायद्यानुसार येणाऱ्या कोणत्याही शासकीय मालमत्तेचा ताबा ,मालकी किंवा नियंत्रण ठेवणे | 39 (3) (a) | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 9 | कायद्यानुसार येणाऱ्या कोणत्याही शासकीय मालमत्तेची विक्री बक्षीस स्वरुपात हस्तांतरण किवा विक्रीचा प्रयत्न करणे. | 39 (3) (b) | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |

| Sr. No. | गुन्ह्याचा तपशील | सदर कलमाचे उल्लंघन होते | शिक्षेचा तपशील कलम 51(1) प्रमाणे | गुन्ह्याचा प्रकार कलम 54 प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| 10 | कायद्यानुसार येणाऱ्या कोणत्याही शासकीय मालमत्तेचा नाश करणे इजा पोहोचवणे | 39 (3) (c) | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 11 | शेडूल I व शेडूल II मधील भाग २ यात नमूद केलेल्या वन्य/बंदिस्त प्राण्याची मालकी /बाळगणे नियंत्रण अथवा त्यांचे मृगयाचिन्ह (ट्रॉफी) यांची सूचना निर्धारित वेळेपूर्वी संबंधित अधिकारी अथवा चीफ वाइल्ड लाइफ वार्डन यांना न करणे [DCF,DFO] | 40 (1) | कमीत कमी ३ वर्षे कारावास व कमीत कमी ₹ १०,००० दंड. | अतडजोड पात्र Non compoundable |
| 12 | शेडूल I व शेडूल II मधील भाग २ यात नमूद केलेल्या वन्य/बंदिस्त प्राण्याची मालकी /बाळगणे नियंत्रण अथवा त्यांचे मृगयाचिन्ह (ट्रॉफी) यांची मालकी वन्य जीव संरक्षण सुधारणा अधिनियम २००२ अन्वये मालकी प्रमाणपत्राशिवाय बाळगणे (वंश परंपरागत मालकी हक्क वगळून ) (जिवंत हत्ती वर लागू नाही ) | 40 (2A) | कमीत कमी ३ वर्षे कारावास व कमीत कमी ₹ १०,००० दंड. | अतडजोड पात्र Non compoundable |
| 13 | शेडूल I व शेडूल II मधील भाग २ यात नमूद केलेल्या वन्य/बंदिस्त प्राण्याची मालकी /बाळगणे नियंत्रण अथवा त्यांचे मृगयाचिन्ह (ट्रॉफी) यांची मालकी वन्य जीव संरक्षण सुधारणा अधिनियम २००२ अन्वये ९० दिवसांच्या आत वंश परंपरागत मालकी हक्क प्रमाणपत्र चीफ वाइल्ड लाइफ वार्डन कडून प्राप्त करून घेणे | 40 (2B) | कमीत कमी ३ वर्षे कारावास व कमीत कमी ₹ १०,००० दंड. | अतडजोड पात्र Non compoundable |

| Sr. No. | गुन्ह्याचा तपशील | सदर कलमाचे उल्लंघन होते | शिक्षेचा तपशील कलम 51(1) प्रमाणे | गुन्ह्याचा प्रकार कलम 54 प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| 14 | शेडूल I व शेडूल II मधील भाग २ यात नमूद केलेल्या वन्य/बंदिस्त प्राण्याची मालकी /बाळगणे नियंत्रण अथवा त्यांचे मृगयाचिन्ह (ट्रॉफी) यांच्यावरील प्रमाणित अधिकारी / चीफ वाइल्ड लाइफ वार्डन यांनी प्रमाणित केलेल्या ओळख खुणा नाहीश्या करणे अथवा नवीन नकली खुणा करणे | 41 (2) | कमीत कमी ३ वर्षे कारावास व कमीत कमी ₹ १०,००० दंड. | अतडजोड पात्र Non compoundable |
| 15 | शेडूल I व शेडूल II मधील भाग २ यात नमूद केलेल्या वन्य/बंदिस्त प्राण्याची मालकी /बाळगणे नियंत्रण अथवा त्यांचे मृगयाचिन्ह (ट्रॉफी) यांची कोणत्याही व्यावसायिक हेतूने विक्री करणे किंवा तसा प्रयत्न करणे | 43 (1) | कमीत कमी ३ वर्षे कारावास व कमीत कमी ₹ १०,००० दंड. | अतडजोड पात्र Non compoundable |
| 16 | शेडूल I व शेडूल II मधील भाग २ यात नमूद केलेल्या वन्य/बंदिस्त प्राण्याची मालकी /बाळगणे नियंत्रण अथवा त्यांचे मृगयाचिन्ह (ट्रॉफी) व्यक्ती राहत असलेल्या राज्यातून इतर राज्यात चीफ वाइल्ड लाइफ वार्डन अथवा प्राधिकृत अधिकारी ज्यांच्या क्षेत्राधीकारात संमती विना वाहतूक करणे | 43 (2) | कमीत कमी ३ वर्षे कारावास व कमीत कमी ₹ १०,००० दंड. | अतडजोड पात्र Non compoundable |
| 17 | विना परवाना (Licence) प्राण्याच्या वस्तू तयार करणे, व्यापार करणे;मृगयाचिन्ह,कच्ची मृगयाचिन्ह, बंधी प्राणी, मांस याचा व्यापार करणे | 44(1)(a) | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |

| Sr. No. | गुन्ह्याचा तपशील | सदर कलमाचे उल्लंघन होते | शिक्षेचा तपशील कलम 51(1) प्रमाणे | गुन्ह्याचा प्रकार कलम 54 प्रमाणे |
|---|---|---|---|---|
| 18 | मासाहारी पदार्थ तयार करणे आणि वाढणे | 44(1)(b) | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 19 | सर्प विष काढणे,संग्रह करणे,व्यापार करणे | 44(1)(c) | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |
| 20 | चीफ वाइल्ड लाइफ वार्डन किंवा इतर प्राधिकृत अधिकारी यांच्या परवानगी शिवाय कुठल्याही वन्य / बंदिस्त प्राणी , अधिसूचित वनस्पती वा त्यांच्या पासून तयार केलेले पदार्थ स्वीकार अथवा वाहतूक करणे | 48A | जास्तीतजास्त ३ वर्षे कारावास सोबत / खेरीज जास्तीतजास्त ₹ २५,००० दंड. | तडजोड पात्र Compoundable |

**९. शिकार करण्यास मनाई** -

कोणताही व्यक्ती कलम ११ आणि १२च्या तर्तुदिशिवाय अनुसूची **I,II,III** आणि **IV**, मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वन्य प्राण्याची शिकार करता येणार नाही.

**११. काही प्रकरणात वन्य प्राण्यांची शिकार करण्याची परवानगी:-**

(1) सध्या प्रभावी असलेल्या कोणतीही असली आणि अध्याय IV मधील तरतुदींच्या आधीन राहून

(a) मुख्य वन्यजीव रक्षक (चिफ वाइल्डलाईफ वॉर्डन) किंवा प्राधिकृत अधिकारी यांच्या संमतीने, जर अनुसूची I,II,III आणि IV मध्ये विनिर्धीष्ट केलेला कोणताही वन्य प्राणी जर मानवी जीवनासाठी धोकादायक असेल, किंवा अपंग असेल, किंवा असाध्य रोगाने ग्रस्त असेल, तर लेखी स्वरुपात आदेश करता येईल ज्यात योग्यती कारणे देऊन कोणत्याही व्यक्तीला अश्या प्राणाची शिकार करण्याची किंवा प्राण्याच्या शिकारीस कारणीभूत होण्याची परवानगी प्राप्त होऊ शकते.

(b) मुख्य वन्यजीव संरक्षक (चिफ वाइल्डलाईफ वॉर्डन) किंवा प्राधिकृत अधिकारी यांच्या संमतीने, जर अनुसूची II, अनुसूची III आणि अनुसूची IV मध्ये विनिर्धीष्ट केलेला कोणताही वन्य प्राणी जर मानवी जीवनासाठी धोकादायक असेल, किंवा मानवी संपत्तीला धोका ठरत असेल (यात कुठल्याही जमिनीवरील उभी पिकं समाविष्ट आहेत) किंवा अपंग असेल, किंवा असाध्य रोगाने ग्रस्त असेल, तर लेखी स्वरुपात आदेश करता येईल ज्यात योग्यती कारणे देऊन कोणत्याही व्यक्तीला अश्या प्राणाची अथवा प्राण्याच्या समुहाची शिकार करण्याची किंवा प्राण्याच्या अथवा प्राण्याच्या समुहाची शिकारीस कारणीभूत होण्याची परवानगी प्राप्त होऊ शकते.

(2) स्वसंरक्षणासाठी अथवा दुसऱ्या व्यक्तीचा बचावासाठी कोणत्याही वन्य प्राण्याला जर जखमी केले, अथवा शिकार केली तर तो अपराध मानला जाणार नाही.

तथापि, सदर उपकलमात कोणत्याही अशा व्यक्तीला निर्दोष ठरवले जाणार नाही, ज्याने असा बचाव करताना सदर कायद्यातीलकोणत्याही तरतुदींच्या किंवा त्यातील नियम किंवा आदेशाच्या विरुद्ध कोणतेही कुत्य केलेले असेल.

(3) स्वसंरक्षणासाठी कोणत्याही वन्य प्राण्याला जखमी किंवा ठार केलं असेल तर ती सरकारी संपत्ती मानली जाईल.

**१२. विशीष्ट उद्दिष्टांसाठी परवानगी मंजूर करणे-**

प्रस्तुत कायद्यातील कोणत्याही भागात काहीही देण्यात आले असले तरीही मुख्य वन्यजीव संरक्षक (चिफ वाइल्डलाईफ वॉर्डन) कोणत्याही व्यक्तीस निर्धारित केलेले शुल्क भरल्यानंतर लेखी आदेशाच्या स्वरूपाने व योग्य त्या कारणांचा उल्लेख करून, अशा परवाना धारकाला शर्तीचा आधीन राहून त्यात निर्धिष्ट केलेल्या कोणत्याही वन्य प्राणाची शिकार करण्याची परवानगी खालिल उद्दिष्टांसाठी मंजूर करू शकतो-

(a) शैक्षणिक

(b) शास्त्रीय संशोधन

(bb) शास्त्रीय व्यवस्थापन

स्पष्टीकरण:- कन्दिका (bb) मधील शास्त्रीय व्यवस्थापन या अभिव्यक्तीचा अर्थ-

(i) कोणत्याही वन्य प्राण्याचे स्थानांतरण (ट्रान्सलोकेशन) पर्यायी अधिवासात करणे

(ii) वन्यजीव जनसंख्या व्य्वस्तापन करणे,ज्यात वन्य प्राण्यांना ठार मारणे, वीष देणे किंवा नष्ट करता येणार नाही.

(c) शास्त्रीय नमुने (स्पेसिमेन) गोळा करणे

(i) मान्यताप्राप्त प्राणीसंग्रहालयांसाठी कलम ३८। च्या आधीन राहून परवानगी किंवा

(ii) वस्तुसंग्रहालय किंवा तत्सम संस्था

(d) सापाचे विष गोळा करणे, त्यातून योग्य भाग बाहेर काढणे त्यातुन जीवनाव्श्क औषधे तयार करण्यासाठी

**27. निर्बंध किंवा अभयारण्यात प्रवेश**

(1) पुढील व्यक्तींशिवाय इतर कोणीही,-

(a) कर्तव्यावर असलेला सरकारी कर्मचारी;

(b) मुख्य वन्यजीव रक्षक (चिफ वाइल्डलाईफ वॉर्डन) किंवा अभयारण्याच्या सीमांमध्ये वास्तव्याची परवानगी आहे अशा प्राधिकृत अधिकाऱ्याने परवानगी दिलेली आहे अशी व्यक्ती;

(c) अभयारण्याच्या सीमांमध्ये असलेल्या एखाद्या स्थावर मालमत्तेवर जिचा हक्क आहे अशी व्यक्ती;

(d) अभयारण्यातून जाणाऱ्या सार्वजनिक महामार्गावरून जाणारी व्यक्ती;

(e) कलम (a), (b) किंवा (c) ह्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती.

कलम 28 अंतर्गत अनुज्ञेय अटींनुसार आणि अटीं अंतर्गत अभयारण्यात प्रवेश किंवा वास्तव्य करणार नाही.

(कलम 27 वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, 1972) - कर्तव्यावर असलेला सरकारी कर्मचारी.

कलम 27(1)(a) कर्तव्यावर असलेल्या सरकारी कर्मचाऱ्याला कोणत्याही अनुमतिशिवाय किंवा परवान्याशिवाय प्रवेश करण्याची परवानगी देते.

कोणते अधिकारी सरकारी कर्मचारी आहेत ह्याची व्याख्या वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, 1972 चे कलम 59 करते.

कलम 59 पुढीलप्रमाणे आहे :

हे अधिकारी सरकारी कर्मचारी असतील - प्रत्येक उल्लेखित (प्रकरण II मध्ये) अधिकारी आणि प्रकरण IVA मध्ये उल्लेखित अध्यक्ष, सदस्य, सदस्य सचिव आणि इतर अधिकारी आणि कर्मचारी, आणि ह्या अधिनियमान्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराची अंमलबजावणी करणारा अन्य प्रत्येक अधिकारी भारतीय दंडसंहितेच्या (45 सन 1860) कलम 21 च्या अर्थांतर्गत एक सरकारी कर्मचारी असल्याचे मानण्यात येईल.

39.**वन्य प्राणी इ. सरकारी मालमत्ता- (1) प्रत्येक** -

(a) वन्य प्राणी, उपद्रवकारक प्राणी वगळता, ज्याची शिकार झाली असेल कलम ११ किंवा कलम २९ च्या उपकलम (1) अंतर्गत किंवा कलम ३५ च्या (6) अंतर्गत किंवा (बंदिस्त अवस्थेत प्रजनन करण्यात आलेले किंवा शिकार केलेले) असेल या कायद्यातील कोणत्याही तरतुदीच्या किंवा त्यातील नियम व आदेशाच्या आधारे किंवा तो मृत सापडला असेल किंवा चुकीने ठार झाला असेल,

(b) कन्दिका (a) मध्ये नमूद केलेला कोणत्याही वन्य प्राण्यापासून तयार केलेली प्राण्याची वस्तू, मृगयाचीन्ह किंवा कच्ची मृगयाचीन्हे किंवा मांस यासंदर्भात सदर कायद्यातील कोणत्याही तरतुदीच्या किंवा त्यातील नियम व आदेशाचे उल्लंघन करून

(c) भारतात आयात केलेले हस्तिदंत आणि हस्तिदंतापासून तयार केलेली वस्तू जी सदर कायद्यातील कोणत्याही तरतुदीच्या किंवा त्यातील नियम व आदेशाचे उल्लंघन करून केली असेल

(d) सदर कायद्यांतर्गत गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन, जहाज, हत्यार, सापळे आणि साधने जी या कायद्याच्या तरतुदीनुसार जप्त करण्यात आलेली आहेत

ती राज्यसरकारची मालमत्ता मानली जाईल आणि केंद्र सरकारने घोषित केलेल्या वन्यजीव अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यानात शिकार झालेला प्राणी किंवा प्राण्याची वस्तू, मृगयाचीन्हे, कच्ची मृगयाचीन्हेकी किंवा मांस (जे वरील प्राण्यांपासून प्राप्त केले असेल, वाहन, जहाज, हत्यार, सापळे आणि साधने जी शिकारीसाठी वापरली असतील) ती केंद्र सरकारची मालमत्ता मानली जाईल

(2) ज्या व्यक्तीने कोणत्याही रीतीने सरकारी मालमत्ता प्राप्त केलेली असेल, तर असा ताबा मिळवल्यापासून पुढील अठ्ठेचाळीस तासांच्या आत त्याने नजीकच्या पोलीस ठाण्यात किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याला त्याची माहिती दिली पाहिजे आणि आवश्यक असल्यास अशी मालमत्ता संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या हवाली केली पाहिजे.

(3) चीफ वाइल्ड लाइफ वार्डन किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याच्या लेखी परवानगी शिवाय कोणत्याही व्यक्तीस,

(a) सरकारी मालमत्तेचा ताबा, मालकी किंवा नियंत्रण ठेवणे

(b) सरकारी मालमत्तेची विक्री बक्षीस स्वरुपात हस्तांतरण किवा विक्रीचा प्रयत्न करणे.

(c) सरकारी मालमत्तेचा नाश करणे इजा पोहोचवणे

**अपराधांचे प्रतिबंधन आणि तपास**

**50. प्रवेशाचा, शोधाचा, अटकेचा आणि स्थानबद्धतेचा अधिकार**

(1) अंमलात असलेल्या कालावधीपुरते इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही दिले असले तरीही, संचालक किंवा त्याच्याद्वारे अधिकृत त्याच्या वतीने काम करणारे इतर कोणतेही कार्यालय किंवा प्रमुख वन्यजीव रक्षक किंवा अधिकृत अधिकारी किंवा कोणताही वन अधिकारी किंवा कोणताही उपनिरीक्षकाच्या पदाखाली नसलेला पोलिस अधिकारी, जर त्याच्याकडे या कायद्याविरुद्ध एखाद्या व्यक्तिने अपराध केल्याचे मानण्यासाठी वाजवी कारण असेल तर, -

a) अशा व्यक्तीस तिच्या नियंत्रणात, ताब्यात, किंवा कब्जात असलेले कोणतेही बंदी प्राणी, वन्य प्राणी, प्राणीजन्य वस्तू, मांस, विजयचिहन (ट्रॉफी), प्रक्रियारहित ट्रॉफी, विनिर्दिष्ट वनस्पती किंवा अंश किंवा त्याचा अर्क, यांसाठी किंवा कोणताही परवाना, अनुमती किंवा तिला देण्यात आलेले किंवा या कायद्याच्या तरतुदींनुसार बाळगावे लागणारे कोणतेही दस्तऐवज यांच्या परीक्षणासाठी सादर करणे आवश्यक असते;

b) शोध घेण्यासाठी किंवा चौकशी करण्यासाठी कोणतेही वाहन किंवा नाव थांबवणे किंवा अशा व्यक्तिच्या नियंत्रणात असलेली वास्तू, भूमी, वाहन किंवा नाव यांत शिरून शोध घेणे व त्या व्यक्तिच्या ताब्यातील कोणतेही सामान किंवा इतर वस्तू उघडून शोध घेणे;

c) कोणत्याही व्यक्तिच्या ताब्यात गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेल्या कोणत्याही सापळ्यासह, साधनासह, वाहनासह, नावेसह किंवा शस्त्रासह कोणताही बंदी प्राणी, वन्य प्राणी, प्राणीजन्य वस्तू, मांस, ट्रॉफी, किंवा प्रक्रियारहित ट्रॉफी, कोणतीही विनिर्दिष्ट वनस्पती किंवा अंश किंवा त्याचा अर्क, ज्यासंबंधाने या कायद्याच्या विरोधात अपराध केल्याचे दिसून येत असेल, ते जप्त करणे आणि त्याला तो उपस्थित राहील आणि त्याच्या विरोधातील अधिमानित आरोपांचे उत्तर देईल असा विश्वास असल्याशिवाय त्याला अधिपत्राशिवाय अटक करणे आणि स्थानबद्ध करणे.

जेव्हा अभयारण्याच्या किंवा राष्ट्रीय उद्यानाच्या दहा किलोमीटरच्या हद्दीत राहणारा मासेमार (कोळी), अनावधानाने व्यावसायिक मासेमारीसाठी वापरण्यात न येणार्‍या नावेने त्या अभयारण्याच्या किंवा राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीतील पाण्यामध्ये मासेमारीचा गळ किंवा जाळे घेऊन उतरल्यास, अशी नाव जप्त केली जाणार नाही.

(2) (1991 वगळले)

(3) उपकलम (1) मध्ये संदर्भ आलेल्या कोणत्याही अधिकार्‍याने कोणत्याही अशा व्यक्तिला परवाना आणि अनुमती सादर करणे आवश्यक असण्याच्या हेतुने थांबवणे आणि स्थानबद्ध करणे कायदेशीर असेल, जी या कायद्याच्या तरतुदीनुसार परवाना किंवा अनुमती यांची गरज असलेली क्रिया करताना अधिकार्‍याला दिसतील, आणि आणि जर अशी व्यक्ति परवाना किंवा अनुमती सादर करण्यास असफल ठरली, तर प्रकरणाच्या स्वरूपानुसार त्या व्यक्तिला तो अधिपत्राशिवाय अटक करू शकतो, जर तिने स्वत:चे नाव व पत्ता देऊन कोणत्याही समन्सना किंवा तिच्याविरोधात होऊ शकणार्‍या इतर प्रक्रियांना उत्तर देण्याचा विश्वास तिला अटक करणार्‍या अधिकार्‍याला देववला नाही तर.

(3)(A) वन्यजीव संवर्धनाच्या साहाय्यक संचालकपदाहून (ACF) कनिष्ठ दर्जाचा नसलेला कोणताही अधिकारी किंवा साहाय्यक वन संवर्धक, ज्याने, किंवा ज्याच्या हाताखालील कर्मचार्‍याने, कोणताही बंदी प्राणी किंवा वन्य प्राणी जप्त केला असल्यास, तो उपकलम (1) च्या खंड (C) नुसार त्याचा ताबा कोणाही व्यक्तीला, त्याने बंधनपत्र निष्पादित केल्यास देऊ शकतो. हे बंधनपत्र, असा प्राणी, आवश्यक असल्यास आणि जेव्हा तसे आवश्यक असेल तेव्हा, ज्या अपराधामुळे जप्ती केली होती त्या अपराधाच्या चौकशीसाठी न्यायाधिकारिता असलेल्या दंडाधिका-यासमोर सादर करण्यासाठी असेल.

(4) वरील अधिकारान्वये कोणतीही स्थानबद्ध व्यक्ति, किंवा जप्त झालेल्या वस्तू, यांचा बंदोबस्त करण्यासाठी कायद्यानुसार मुख्य वन्यजीव रक्षकाला किंवा याबाबतीत त्याच्याद्वारे प्राधिकृत अधिकार्‍याला सूचित करून ताबडतोब दंडाधिकार्‍यासमोर नेल्या जातील.

(5) वाजवी कारणाशिवाय, कोणतीही व्यक्ति या कलमान्वये सादर करणे आवश्यक असलेली कोणतीही बाब सादर करण्यास अयशस्वी ठरल्यास, कायद्याविरोधात अपराधासाठी दोषी असेल.

(6) कोणतेही मांस, प्रक्रियारहित ट्रॉफी, विनिर्दिष्ट वनस्पती किंवा अंश किंवा त्याचा अर्क या कलमाच्या तरतुदींच्या अन्वये जप्त झाल्यास, वन्यजीव जतनाचा सहायक संचालक किंवा त्याच्याद्वारे प्राधिकृत, त्याच्या वतीने राजपत्रित पदावरील अधिकारी किंवा मुख्य वन्यजीव रक्षक किंवा प्राधिकृत अधिकारी यांची विहित असेल त्या पद्धतीने विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करू शकतो.

(7) उपकलम (1) मध्ये संदर्भ आलेला कोणताही अधिकारी कोणत्याही व्यक्तिकडे या कायद्याच्या विरोधातील अपराधाचा प्रतिबंध किंवा तपास करण्यासाठी किंवा हा कायदा मोडण्याचा आरोप असलेल्या व्यक्तिंना पकडण्यासाठी, किंवा उपकलम (1) च्या खंड (c) नुसार जप्तीसाठी साहाय्य मागायला येतो, तेव्हा तसे साहाय्य करणे हे अशा व्यक्तिचे किंवा व्यक्तिंचे कर्तव्य असेल.

(8) सध्या अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही म्हटले असले तरी, वन्यजीव जतनाच्या सहायक संचालक पदाच्या हुद्द्याहून कनिष्ट नसलेला कोणताही अधिकारी किंवा सहायक वन संवर्धकाच्या (ACF) हुद्द्याहून कनिष्ट नसलेला अधिकारी ज्यास राज्य शासनाने प्राधिकृत केले असेल, त्यास याबाबतीत या कायद्याच्या कोणत्याही तरतुदीविरोधातील अपराधाबाबत तपासणी करण्याच्या हेतुकरिता अधिकार असतील -

(a) शोध अधिपत्र (सर्च वॉरंट) देणे

(b) साक्षीदाराच्या उपस्थितीची अंमलबजावणी करणे;

(c) दस्तऐवज आणि महत्त्वाच्या वस्तूंचा शोध आणि सादरीकरण करावयास लावणे; आणि

(d) पुरावा मिळवणे आणि नोंदवणे.

(9) उपकलम (8) च्या खंड (d) अन्वये नोंदवलेला कोणताही पुरावा दंडाधिकार्‍यासमोर होणार्‍या त्यापुढील कोणत्याही खटल्यामध्ये स्वीकारार्ह असेल, जर तो आरोपी व्यक्तिच्या उपस्थितीत घेण्यात आला असेल तर.

**51.दंड:**

(1) जी कोणतीही व्यक्ती या कायद्याच्या प्रकरण ५-अ आणि कलम ३८-ज खेरीज इतर प्रसंगी किंवा त्याअन्वये केलेल्या नियमाच्या किंवा आदेशाच्या तरतुदींचे उल्लंघन करील किंवा कोणत्याही परवान्याच्या किंवा अनुमतीच्या अटींपैकी कोणत्याही अटीचा भंग करेल ती या कायद्याविरुद्धच्या अपराधाबद्दल दोषी ठरेल आणि तिला हा अपराध सिद्ध झाल्यावर जास्तीतजास्त तीन वर्षांपर्यंत कारावासाची किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

मात्र, ज्या प्रसंगी अनुसूची । किंवा अनुसूची ॥ च्या भाग २ मधील प्राण्याच्या संबंधातील अपराध असेल, किंवा अशा प्राण्याच्या मांसासंबंधी किंवा प्राणीजन्य वस्तूंसंबंधी, किंवा त्या प्राण्याची मृगयाचिन्हे किंवा कच्ची मृगयाचिन्हे यांसंबंधी अपराध असेल किंवा वन्यजीव

अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यानात शिकारीसंबंधी किंवा सीमारेषाबदलासंबंधी अपराध असेल, त्यावेळी अशा अपराधास  कमीतकमी तीन ते सात वर्षांपर्यंतची शिक्षा आणि कमीतकमी रुपये दहा हजारपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

आणखी असे, की या उपकलमामध्ये नमूद केलेल्या स्वरूपाचा दुसरा किंवा त्यापुढील गुन्हा घडल्यास, कारावासाची मुदत तीन वर्षांहून कमी नसेल पण सात वर्षांपर्यंत वाढू शकेल आणि तसेच दंड हा पंचवीस हजार रुपयांहून कमी नसेल.

(1A) प्रकरण 5-A च्या तरतुदींचा भंग करण्याच्या गुन्ह्यास कमीतकमी तीन वर्षे व जास्तीतजास्त सात वर्षे व कमीतकमीदहा हजार रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

(1B) कलम 38J चा भंग करणाऱ्यास जास्तीतजास्त६ महिन्याची किंवा दोन हजार रुपयांपर्यंतची दंडाची शिक्षा होऊ शकेल किंवा दोन्ही होऊ शकतील.

दुसरा किंवा त्यापुढील गुन्हा घडल्यास, कारावासाची मुदत एकावर्षांपर्यंत वाढू शकते किंवा दंड पाच हजार रुपयांपर्यंत वाढू शकतो.

(1C) कोणत्याही व्यक्तिने टायगर रिझर्व्हच्या कोर क्षेत्रामध्ये गुन्हा केला असेल किंवा व्याघ्र टायगर रिझर्व्हमध्ये  शिकारीचा गुन्हा केला असेल किंवा टायगर रिझर्व्हच्या सीमारेषा बदलण्यासंबंधित गुन्हा केला असेल तर अशा दोषी व्यक्तीस पहिल्या खेपेस कमीतकमी तीन वर्ष ते सात वर्षांपर्यंत वाढू शकणारा कारावास होईल आणि कमीतकमी पन्नास हजार रुपये ते जास्तीतजास्तदोन लाख रुपयांपर्यंतचा आर्थिक दंड होईल; आणि गुन्हा दुसर्‍यांदा झाल्यास किंवा गुन्ह्याची पुनरावृत्ती झाल्यास दोषी व्यक्तीस कमीतकमी सात वर्षे कारावास आणि पन्नास हजार रुपये ते पाच लाख रुपयांपर्यंतचा दंड होईल.

(1D) उपकलम 1C मध्ये नमूद केलेल्या गुन्ह्याला कोणी प्रोत्साहन दिले, आणि जर उत्तेजित क्रिया उत्तेजनाचा परिणाम म्हणून घडून आली, तर तो त्या गुन्ह्यासाठी पुरवण्यात आलेल्या शिक्षेस पात्र ठरेल.

(2) ज्या प्रसंगी कोणत्याही व्यक्तीस या कायद्याविरोधातील अपराधासाठी शिक्षा झाली असेल त्या प्रसंगी खटला चालविणारे न्यायालय बंदी प्राणी, वन्य प्राणी, प्राणीजन्य वस्तू, मृगयाचिन्हे, कच्ची मृगयाचिन्हे, मांस, भारतात आयात केलेले हस्तिदंत किंवा अशा हस्तिदंतापासून तयार केलेल्या वस्तू, कोणतीही विनिर्दिष्ट वनस्पती किंवा अंश किंवा त्याचा अर्क ज्याच्यासंबंधी गुन्हा घडला आहे आणि तो करताना वापरात आलेले सापळे, हत्यारे, वाहन, नाव किंवा शस्त्र हे

राज्य शासनाद्वारे जप्त करण्यासंबंधी आदेश देऊ शकेल आणि अशा व्यक्तिने घारण केलेला कोणताही परवाना किंवा अनुमती रद्द करण्यासंबंधी आदेश देऊ शकेल.

(3) अशा रीतीने परवाना किंवा अनुमती रद्द करणे हे अशा अपराधाबद्दल दिलेल्या शिक्षेखेरीज अतिरिक्त शासन असेल.

(4) ज्या प्रसंगी कोणत्याही व्यक्तीस या कायद्याविरोधातील अपराधाबद्दल शिक्षा झाली असेल त्या प्रसंगी न्यायालय त्या व्यक्तीला शस्त्रास्त्र अधिनियम, १९५९(१९५९ चे ५४) अन्वये जी शस्त्रे बाळगण्यासंबंधी परवाना दिला आहे तो रद्द करण्यात यावा व त्या व्यक्तीला शिक्षा झाल्याच्या दिनांकापासून ५ वर्षांपर्यंत शस्त्रास्त्र अधिनियम, १९५९(१९५९ चे ५४) नुसार परवाना देण्यात येऊ नये असा आदेश देऊ शकेल.

(5) फौजदारी दंड संहिता १९७३ (१९७४ चे २) च्या कलम ३६० मधील किंवा अपराध परिवीक्षा कायदा, १९५८ (१९५८ चे २०) च्या तरतुदी अभयारण्यात किंवा राष्ट्रीय उद्यानात शिकारीच्या संदर्भात केलेल्या गुन्ह्यास, तसेच प्रक्ररण ५-अ च्या कोणत्याही तरतुदी, अपराध सिद्ध झालेल्या व्यक्तीस ती व्यक्ती १८ वर्षांहून कमी वयाची असल्याखेरीज लागू असणार नाहीत.

**51A. जामीन मंजूर करताना लागू होणाऱ्या विशिष्ट अटी**

जर अपराध अनुसूची । किंवा अनुसूची ॥ च्या भाग २ मधील प्राण्याच्या संबंधातील असेल, किंवा वन्यजीव अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यानात शिकारीसंबंधी किंवा सीमारेषा बदलासंबंधी अपराध असेल तर या कायद्यान्वये कोणत्याही अपराधाच्या आरोपी व्यक्तिला कायद्याच्या तरतुदींखाली अटक झाली असेल, तर फौजदारी दंड संहिता १९७३ (१९७४ चे २) मध्ये काहीही म्हटले असले तरी, या कायद्यान्वये अपराधासाठी दोषी सिद्ध झालेल्या व्यक्तीला पुढील बाबींची पूर्तता झाल्याशिवाय जामिनावर सोडता येणार नाही.

(a) सरकारी वकीलास जामीन अर्जास विरोध करण्याची संधी दिली होती; आणि

(b) सरकारी वकीलाने जामीन अर्जास विरोध केला व आरोपीने अपराधी कृत्य केले नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे व जामीन काळात आरोपी अपराध करणार नाही अशी न्यायालयाची खात्री झाली असेल तर.

**52. प्रयत्न करणे व प्रोत्साहन देणे**

वन्य जीव (संरक्षण) कायदा अधिनियम, १९७२ चे कलम ५२ विहित करते की, जो कोणी या कायद्यामधील तरतुदींचा किंवा नियमांचा किंवा त्यात दिलेल्या आदेशाचा भंग करण्याचा प्रयत्न करतो किंवा भंग करण्यास उत्तेजन देतो त्याने त्या तरतुदीचा, किंवा नियमाचा किंवा आदेशाचा, जसे असेल तसे, भंग केला असल्याचे मानण्यात येईल.

**53. गैर रीतीने जप्त केल्यास शिक्षा**

या अधिनियमान्वये अधिकार गाजवणारी कोणत्याही व्यक्तिने त्रास देण्याच्या हेतुने आणि विनाकारण कोणाही व्यक्तिची मालमत्ता कलम ५० मधील तरतुदीच्या नावाखाली पकडली, तर त्यास दोषसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत कारावासाची किंवा ₹ ५०० दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**54. अपराध तडजोड करण्याची शक्ती**

(1) केंद्र शासन अधिसूचना प्रसिद्ध करून वन्यजीव संवर्धनाच्या संचालकांना किंवा वन्यजीव संवर्धनाच्या साहाय्यक संचालकपदाहून कनिष्ट नसलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याला आणि राज्य सरकाराच्या बाबतीत, तशाच पद्धतीने चीफ वाइल्ड लाईफ वॉर्डन किंवा उप-वनसंवर्धकाच्या पदाहून कनिष्ट नसलेल्या अन्य अधिकाऱ्याला, या कायद्याविरोधात अपराध केल्याचा वाजवी संशय असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून त्या व्यक्तीने केला असल्याचा संशय असलेल्या गुन्ह्यासाठीच्या भरपाईचे अधिदान म्हणून पैशाची रक्कम स्वीकारण्याचा अधिकार देऊ शकते.

(2) अशा पैशाच्या रकमेच्या अधिकाऱ्याला केलेल्या अधिदानानंतर, संशयित व्यक्तीस, जर ती कोठडीत असली तर, सोडून देण्यात येईल आणि अपराधाबाबत त्या व्यक्तिविरोधात कोणत्याही पुढील प्रक्रिया करण्यात येणार नाहीत.

(3) कोणत्याही अपराधाची तडजोड करणारा अधिकारी या कायद्यांतर्गत अपराध्यास देण्यात आलेला कोणताही परवाना किंवा अनुमती रद्द करण्याचे आदेश देऊ शकेल, आणि जर असे करण्याचा त्यास अधिकार नसेल, तर असा परवाना किंवा अनुमती रद्द करण्यासाठी अधिकार असलेल्या अधिकाऱ्याकडे जाऊ शकेल.

4) उपकलम (१) अंतर्गत भरपाई म्हणून स्वीकारण्यात आलेली किंवा स्वीकारायचे ठरलेली पैशाची रक्कम, कोणत्याही प्रकरणात पंचवीस हजार रुपयांवर जाणार नाही.

हे लक्षात घेऊन की, कलम 51 मध्ये कारावासाचा किमान कालावधी विहित असलेल्या कोणत्याही अपराधासाठी तडजोड करण्यात येणार नाही.

**55. अपराधांची दखल घेणे -**

या अधिनियमानुसार घडलेल्या कोणत्याही गुन्ह्याची दखल कोणतेही न्यायालय, पुढील अधिकाऱ्यांनी केली असल्याखेरीज घेणार नाही -

(a) संचालक, वन्यजीव संवर्धन किंवा या बाबतीत केंद्र शासनाद्वारे अधिकृत इतर कोणताही अधिकारी;

(aa) सदस्य सचिव, केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, प्रकरण ४(A) मधील तरतुदींच्या उल्लंघनाशी संबंधित बाबींमध्ये; किंवा

(ab) सदस्य सचिव, व्याघ्र संवर्धन प्राधिकरण; किंवा

(ac) संबंधित टायगर रिझर्व्हचे संचालक; किंवा

(b) चीफ वाइल्ड लाइफ वॉर्डन, किंवा राज्य शासनाद्वारे या बाबतीत अधिकृत करण्यात आलेला इतर कोणताही अधिकारी, त्या शासनाद्वारे विनिर्दिष्ट अशा अटींच्या अधीन राहून; किंवा

(bb) कलम ३८ J मधील तरतुदींच्या उल्लंघनासंबंधी प्राणीसंग्रहालयाच्या प्रमुखपदी असलेला अधिकारी; किंवा

(c ) अभिकथित आरोपाची आणि त्याच्या तक्रार करण्याच्या उद्देशाची केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला किंवा अधिकृत अधिकाऱ्याला किंवा वर उल्लेखितांना विहित पद्धतीने साठ दिवसांहून कमी नसलेल्या दिवसांची सूचना देणारी व्यक्ती.

### 57. काही प्रकरणांत धरावयाची गृहिते

या कायद्याविरोधातील अपराधासाठीच्या खटल्यामध्ये, असे प्रस्थापित झाले की एखादी व्यक्ति कोणत्याही बंदी प्राणीचा, प्राणीजन्य वस्तूचा (मांस, मृगयाचिन्ह, कच्चे मृगयाचिन्ह, विनिर्दिष्ट वनस्पती किंवा त्याचा भाग किंवा त्याचा अर्क) ताबा, मालकी किंवा नियंत्रण ठेवून आहे, तर विरुद्ध स्थिती सिद्ध होईपर्यंत असे गृहित धरले जाईल, की अशी व्यक्ती बेकायदेशीररीत्या अशा बंदी प्राणीचा, प्राणीजन्य वस्तूचा (मांस, मृगयाचिन्ह, कच्चे मृगयाचिन्ह, विनिर्दिष्ट वनस्पती किंवा त्याचा भाग किंवा त्याचा अर्क) ताबा, मालकी किंवा नियंत्रण ठेवून आहे व हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीची राहील.

### 60. चांगल्या हेतुने केलेल्या क्रियेचे संरक्षण

(1) या कायद्यांतर्गत चांगल्या हेतुने काहीही केल्याबद्दल किंवा करण्याच्या हेतुबद्दल कोणताही वाद, खटला, किंवा इतर कायदेशीर प्रक्रिया कोणत्याही अधिकाऱ्याविरोधात किंवा केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या इतर कर्मचाऱ्याविरोधात चालवली जाणार नाही.

(2) या कायद्यांतर्गत चांगल्या हेतुने केलेल्या कोणत्याही क्रियेने झालेले किंवा होऊ शकणारे कोणतेही नुकसान केल्याबद्दल किंवा करण्याच्या हेतुबद्दल कोणताही वाद, किंवा इतर कायदेशीर प्रक्रिया कोणत्याही केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या कर्मचाऱ्याविरोधात किंवा कोणत्याही अधिकाऱ्याविरोधात चालवली जाणार नाही.

[(3) या कायद्यांतर्गत चांगल्या हेतुने काहीही केल्याबद्दल किंवा करण्याच्या हेतुबद्दल प्रकरण IVA मध्ये संदर्भित प्राधिकरणांविरोधात किंवा त्याच्या प्रमुखाविरोधात, सदस्यांविरोधात, सदस्य-सचिवांविरोधात, अधिकाऱ्यांविरोधात आणि इतर कर्मचाऱ्यांविरोधात कोणताही वाद किंवा इतर कायदेशीर प्रक्रिया चालवली जाणार नाही.]

| अपराधांचा प्रतिबंधन आणि तपासाकरिता Wild Life (Protection) Act, 1972 अंतर्गत प्राधिकृत अधिकाऱ्यांची यादी | | |
|---|---|---|
| **कलम** | **तपशील** | **MH [No.Desk 23(4)/Cno.494/1603 Dated 26 july 2013** |
| 11(1)(b) | अनुसूची २, अनुसूची ३, किंवा अनुसूची ४ मध्ये विनिर्दिष्ट असलेल्या कोणत्याही वन्यजीवाची शिकार करण्याची अनुमती जर तो मानवी जीवनास किंवा मालमत्तेस (कोणत्याही जमिनीवरील उभे शेत समाविष्ट) धोकादायक अेल किंवा बरा होण्यापलिकडे अपंग किंवा रोगग्रस्त झाला असेल तर. | APPCF[WL],FD[TR],CCF,GM[FDCM],RM[FDCM],DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],DM[FDCM],ACF,Assistant Manager [FDCM]{only Nil gai and wild pig},RFO{only Nil gai and wild pig},RFO[FDCM]{only Nil gai and wild pig} |
| 17 C (1) | विनिर्दिष्ट वनस्पतीची लागवड करण्याचा परवाना देणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 17 D (1) | विनिर्दिष्ट वनस्पती किंवा तिचा भाग किंवा तिचा अर्क यांचा विक्रेता म्हणून व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा सुरू ठेवण्यासाठी परवाना देणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 17 E (1) | विनिर्दिष्ट वनस्पती किंवा तिचा भाग किंवा तिचा अर्क यांची लागवड करणारी किंवा व्यवहार करणारी प्रत्येक व्यक्ती वन्यजीव (संरक्षण)(सुधारणा) अधिनियम, १९९१ सुरू झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत मुख्य वन्यजीव रक्षकाला किंवा राज्य शासनाद्वारे त्याच्या वतीने अधिकृत इतर कोणत्याही अधिकाऱ्याला स्वत:च्या अशा वनस्पतींच्या आणि त्यांच्या अशांच्या किंवा अर्कांच्या साठ्याबद्दल, जे असतील ते, सुरुवात केल्याच्या दिवशी सूचित करतील. | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 27 (1) (B) | वन्यजीव अभयारण्याच्या सीमामर्यादांमध्ये राहण्याची अनुमती देणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 27 (2) C | कोणत्याही वन्यजीवाच्या मृत्युची माहिती देणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],ACF,RFO,Forester,FG |
| 28 | APPCF[WL],FD[TR],CCF | |
| 28(1)a | तपासणी किंवा वन्यजीवांच्या अभ्यासाकरिता अनुमती देणे | |
| 28(1)d | पर्यटनासाठी अनुमती देणे | ,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],ACF |
| 28(1)e | कायदेशीर व्यवहार करण्यासाठी अनुमती देणे | ,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],ACF |
| 31 | वन्यजीव अभयारण्यात शस्त्र घेऊन प्रवेश करण्याची अनुमती | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],ACF |

| अपराधांचा प्रतिबंधन आणि तपासाकरिता Wild Life (Protection) Act, 1972 अंतर्गत प्राधिकृत अधिकाऱ्यांची यादी | | |
|---|---|---|
| **कलम** | **तपशील** | **MH [No.Desk 23(4)/Cno.494/1603 Dated 26 july 2013** |
| 33(a) | रस्ते, पूल, यांचे बांधकाम, पूल, कुंपणे व अडथडे बांधणे. अभयारण्यासाठी आवश्यक इतर कामे | APPCF[WL],FD[TR],CCF,GM[FDCM],RM[FDCM],DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 33(b) | वन्य पशूंच्या सुरक्षेसाठी आणि अभयारण्य जतन करण्यासाठी उचललेली पावले | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 33(c) | वन्यजीवांच्या हिताकरिता आणि त्यांच्या निसर्ग निवासातील सुधारणेकरिता उपाययोजना | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 33 A | वन्यजीव अभयारण्याच्या ५ किमी त्रिज्येतील पशुधनाचे लसीकरण | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],DM[FDCM],ACF |
| 34 (1) | शस्त्रास्त्र अधिनियम १९५९ अंतर्गत परवाना मिळालेल्या शस्त्रांच्या नोंदणीसाठीचा अर्ज स्वीकारणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 34 (2) | शस्त्र असलेल्या अर्जदाराचे नाव नोंदवणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 34 (3) | शस्त्रात्र अधिनियम, १९५९ अंतर्गत कोणताही नवा परवाना निर्गमित करण्यासाठी सहमती मिळवणे | APPCF[WL],FD[TR],CCF |
| 34 A(1/a) | वन्यजीव अभयारण्यातील किंवा राष्ट्रीय उद्यानातील शासकीय भूमीवर बेकायदेशीररीत्या कब्जा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तिला बाहेर काढण्यास अधिकृत | APPCF[WL],FD[TR],CCF,GM[FDCM],RM[FDCM],DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],DM[FDCM],ACF,Assistant Manager [FDCM] |
| 34 A(1/b) | अनधिकृत रचना, इमारत किंवा उभारलेली बांधकामे काढण्याचा, सर्व वस्तू व साधने जप्त करण्याचा अधिकार | APPCF[WL],FD[TR],CCF,GM[FDCM],RM[FDCM],DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],DM[FDCM],ACF,Assistant Manager [FDCM] |
| 35 (8) r/w 31 | वन्यजीव अभयारण्यात शस्त्र घेऊन प्रवेश करण्याची अनुमती | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],ACF |
| 35 r/w 33(a) | रस्ते, पूल, यांचे बांधकाम, पूल, कुंपणे व अडथडे बांधणे. अभयारण्यासाठी आवश्यक इतर कामे | |
| 35 r/w 34 (1) | शस्त्रास्त्र अधिनियम १९५९ अंतर्गत परवाना मिळालेल्या शस्त्रांच्या नोंदणीसाठीचा अर्ज स्वीकारणे | APPCF[WL],FD[TR],CCF |
| 35 r/w 34 (2) | शस्त्र असलेल्या अर्जदाराचे नाव नोंदवणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |

| अपराधांचा प्रतिबंधन आणि तपासाकरिता Wild Life (Protection) Act, 1972 अंतर्गत प्राधिकृत अधिकाऱ्यांची यादी | | |
|---|---|---|
| **कलम** | **तपशील** | **MH [No.Desk 23(4)/Cno.494/1603 Dated 26 july 2013** |
| 35 r/w 34 (3) | शस्त्रात्र अधिनियम, १९५९ अंतर्गत कोणताहा नवा परवाना निर्गमित करण्यासाठी सहमती मिळवणे | APPCF[WL],FD[TR],CCF |
| 39(3) | सरकारी मालमत्तेचा ताबा, मालकी, नियंत्रण, भेटीद्वारे हस्तांतरण, विक्री, इतर किंवा ती नष्ट करण्यासाठी किंवा तिची हानी करण्यासाठी लेखी परवानगी देणे. | APPCF[WL],FD[TR],CCF,GM[FDCM],RM[FDCM],DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],DM[FDCM] |
| 40 (1) | कोणताही अनुसूची । किंवा अनुसूची ॥ भाग २ मध्ये विनिर्दिष्ट असलेला बंदी प्राणी, प्राणीजन्य वस्तू, त्यापासून मिळवलेले मृगयाचिन्ह किंवा कच्चे मृगयाचिन्ह यांच्या नियंत्रणाचे, मालकीचे, ताब्याचे प्रकटन स्वीकारणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],ACF,RFO |
| 40(2) | अनुसूची । किंवा अनुसूची ॥ भाग २ मध्ये विनिर्दिष्ट असलेला प्राणी मिळवण्यासाठी, स्वीकारण्यासाठी, नियंत्रणासाठी, मालकीसाठी, ताब्यासाठी, विक्री प्रस्तावासाठी किंवा विक्रीसाठी, हस्तांतरणासाठी किंवा वाहतुकीसाठी, अशा प्राण्यापासून मिळवलेले कच्चे मृगयाचिन्ह किंवा मांस किंवा खारवलेले किंवा सुकवलेले चामडे किंवा कस्तुरी किंवा गेंड्याचे शिंग यांसाठीची लेखी परवानगी देणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 40(4) | अनुसूची । व अनुसूची ॥ भाग २ मध्ये विनिर्दिष्ट असलेला कोणताही प्राणी, प्राणीजन्य वस्तू, मृगयाचिन्ह, खारवलेले किंवा सुकवलेले चामडे असणाऱ्या व्यक्तिकडून विहित वेळेमध्ये प्रकटन स्वीकारणे | APPCF[WL],FD[TR],CCF |
| 41(1) | मालसाठ्याच्या वास्तूमध्ये प्रवेश करण्यासाठी, चौकशी करण्यासाठी आणि तयार करण्यासाठी, विहित पद्धतीने ओळखचिन्हे चिकटवण्यासाठी | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 42 | वन्यपशूंच्या मृगयाचिन्हाच्या मालकीचे प्रमाणपत्र निर्गमित करणे | APPCF[WL],FD[TR],CCF |

| अपराधांचा प्रतिबंधन आणि तपासाकरिता Wild Life (Protection) Act, 1972 अंतर्गत प्राधिकृत अधिकाऱ्यांची यादी | | |
|---|---|---|
| **कलम** | **तपशील** | **MH [No.Desk 23(4)/Cno.494/1603 Dated 26 july 2013** |
| 43(2) | कोणत्याही बंदी प्राणीच्या, प्राणीजन्य वस्तूच्या, मृगयाचिन्हाच्या किंवा कच्च्या मृगयाचिन्हाच्या एका राज्यातून दुसऱ्या राज्यामध्ये वाहतूकीची किंवा हस्तांतरणाची माहिती ३० दिवसांच्या आत स्वीकारणे | APPCF[WL],FD[TR],CCF |
| 44 (2) | उत्पादकाकडून किंवा विक्रेत्याकडून त्याच्याकडील बंदी पशूंच्या, प्राणीजन्य वस्तूंच्या, मृगयाचिन्हांच्या किंवा कच्च्या मृगयाचिन्हांच्या साठ्याचे प्रकटन मिळवणे | APPCF[WL],FD[TR],CCF |
| 44 (3) | उत्पादकास किंवा विक्रेत्यास किंवा चर्मपूरकास किंवा उपहारगृहास किंवा सापाचे विष काढण्याची, गोळा करण्याची परवानगी असणाऱ्या व्यक्तीस परवाना देण्यासाठीचा अर्ज स्वीकारणे | APPCF[WL],FD[TR],CCF |
| 44 (4) | | APPCF[WL],FD[TR],CCF |
| 44(7) | मृगयाचिन्हे आणि प्राणीजन्य वस्तू यांचा व्यवहार करण्यासाठीच्या परवान्याचे नूतनीकरण करणे | APPCF[WL],FD[TR],CCF |
| 45 | कलम ४४ अन्वये दिलेला किंवा नूतनीकृत केलेला परवाना निलंबित अथवा रद्द करणे | APPCF[WL],FD[TR],CCF |
| 47(a)(ii) | परवानाधारकाकडून नोंद तपासणीची मागणी करणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 47(b) | नोंदी ठेवणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],ACF,RFO |
| 48A | कोणताही वन्यप्राणी, प्राणीजन्य वस्तू, विनिर्दिष्ट वनस्पती किंवा अंश किंवा तिचा अर्क यांच्या वाहतुकीची परवानगी देणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 49 B (4) | चर्मपूरकास अनुसूची I किंवा अनुसूची II भाग २ मध्ये विनिर्दिष्ट प्राण्याचे चर्मपूरण करण्याची किंवा प्राणीजन्य वस्तूसाठीची परवानगी देणे | APPCF[WL],FD[TR],CCF |
| 49C(1) (2) (6) | प्राणीजन्य वस्तूचे इतर राज्यातून हस्तांतरण आणि वाहतूक यांबद्दलचे विक्रेत्यांचे प्रकटन स्वीकारणे | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 49C(2) | | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |

| अपराधांचा प्रतिबंधन आणि तपासाकरिता Wild Life (Protection) Act, 1972 अंतर्गत प्राधिकृत अधिकाऱ्यांची यादी | | |
|---|---|---|
| **कलम** | **तपशील** | **MH [No.Desk 23(4)/Cno.494/1603 Dated 26 july 2013** |
| 49 C (6) | | APPCF[WL],FD[TR],CCF,DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION] |
| 50(1) | प्रवेशाचा, झडतीचा, स्थानबद्ध करण्याचा व अटक करण्याचा अधिकार | APPCF[WL],FD[TR],CCF,GM[FDCM],RM[FDCM],DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],DM[FDCM],ACF,Assistant Manager [FDCM],RFO,RFO[FDCM],Forester, FG,Forester[FDCM], FG[FDCM] |
| 50(3) | परवाने, अनुमती आणि दस्तऐवजीकरण यांचे परीक्षण | APPCF[WL],FD[TR],CCF,GM[FDCM],RM[FDCM],DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],DM[FDCM],ACF,Assistant Manager [FDCM],RFO,RFO[FDCM],Forester, FG,Forester[FDCM], FG[FDCM] |
| 50(3A) | बंधपत्रावर मुक्तता | APPCF[WL],FD[TR],CCF,GM[FDCM],RM[FDCM],DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],DM[FDCM],ACF |
| 50 (4) | अटक झालेल्या व्यक्तिबद्दल व जप्त केलेल्या वस्तूबद्दल सूचना | |
| 50(6) | मांस, कच्चे मृगयाचिन्ह, विनिर्दिष्ट वनस्पतीचे अर्क यांची विल्हेवाट - अनुसूची I | APPCF[WL],FD[TR],CCF,GM[FDCM],RM[FDCM],DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],DM[FDCM],ACF,Assistant Manager [FDCM],RFO |
| | मांस, कच्चे मृगयाचिन्ह, विनिर्दिष्ट वनस्पतीचे अर्क यांची विल्हेवाट - अनुसूची II, ३, ४, ६ | |
| 54 (1) | अपराधाबाबत तडजोड करणे | APPCF[WL],FD[TR],CCF,GM[FDCM],RM[FDCM],DCF |
| 55(b) | न्यायालयात तक्रार दाखल करणे | APPCF[WL],FD[TR],CCF,GM[FDCM],RM[FDCM],DCF,DFO,DD[TR],SDFO[INDEPENDENT SUB-DIVISION],DM[FDCM],ACF,Assistant Manager [FDCM],RFO,RFO[FDCM],Honarary Wildlife Warden |

**वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, 1972 अनुसार अपराधामध्ये शामिल असलेल्या प्राण्यांची अनुसूची प्रमाणे यादी.**

| Sr.no as per Schedule list given in the Act (अनुसूची नुसार क्रमांक) | English Name (इंग्रजी नाव) | Scientific Name (वैज्ञानिक नाव) | Marathi Name (मराठी नाव) |
|---|---|---|---|
| Schedule - I (अनुसूची - I) | | | |
| Part I (भाग - I) | | | |
| MAMMALS (सस्तन प्राणी) | | | |
| 2 | Black buck | *Antelope cervicapra* | काळवीट /कृष्ण मृग |
| 5 | Cheetah | *Acinonyx jubatus* | चीता |
| 5-B | Chinkara/Indian Gazelle | *Gazella gazelle bennetti* | चिंकारा |
| 8 | Fishing Cat | *Felis viverrina* | |
| 8-A | Four-horned antelope | *Tetraceros quadricornis* | चौशिंगा |
| 8-E | Gaur or Indian bison | *Bos gaurus* | गौर |
| 11 | Hispid Hare | *Caprolagus hispidus* | |
| 12-B | Indian Elephant | *Elephas maximus* | हती |
| 13 | Indian Lion | *Panthera leo persica* | सिंह |
| 15 | Indian Wolf | *Canis lupas pallipes* | लांडगा |
| 16-B | Leopard/Panther | *Panthera pardus* | बिबट्या |

| Sr.no as per Schedule list given in the Act (अनुसूची नुसार क्रमांक) | English Name (इंग्रजी नाव) | Scientific Name (वैज्ञानिक नाव) | Marathi Name (मराठी नाव) |
|---|---|---|---|
| 24-A | Mouse Deer | *Tragulus meminna* | पिसोरी |
| 28 | Pangolin | *Maniscrassi caudata* | खवले मांजर |
| 29-A | Ratel | *Mellivora capensis* | चांदी अस्वल |
| 31 | Rusty spotted cat | *Felis rubiginosa* | |
| 31-C | Sloth Bear | *Melursus ursinus* | अस्वल |
| 35 | Swamp Deer | All sub-species of *Cervus duvauceli* | बाराशिंगा |
| 39 | Tiger | *Pantherat igris* | वाघ |
| 41 | Wild Buffalo | *Bubalus bubalis* | जंगली म्हैस |
| Part II (भाग - II) | | | |
| AMPHIBIANS AND REPTILES (उभयचर एवं सरीसृप) | | | |
| 1 | Agra Monitor Lizard | *Varanus griseus* (Daudin) | घोरपड |
| 1-C | Barred, Oval or Yellow Monitor Lizard | *Varanus flavescens* | घोरपड |
| 1-D | Crocodiles | *Crocodilus palustris* | मगर |
| 2 | Gharial | *Gravialis gangeticus* | सुसर |
| 3 | Ganges Soft-shelled Turtle | *Trionyx gangeticus* | कासव |
| 7 | Indian Egg-eating Snake | *Elachistodon westermanni* | कासव |

| Sr.no as per Schedule list given in the Act<br>(अनुसूची नुसार क्रमांक) | English Name<br>(इंग्रजी नाव) | Scientific Name<br>(वैज्ञानिक नाव) | Marathi Name<br>(मराठी नाव) |
|---|---|---|---|
| 8 | Indian Soft-shelled Turtle | *Lissemys punctata punctate* | कासव |
| 9 | Indian Tent Turtle | *Kachuga tecta tecta* | कासव |
| 10 | Large Bengal Monitor Lizard | *Varanus bengalensis* | घोरपड |
| 14-A | Pythons | Genus *Python* | अजगर |
| Part III (भाग - III) | | | |
| BIRDS (पक्षी) | | | |
| 1-B | Bazas | *Aviceda jeordone and Aviceda leuphotes* | ससाणा |
| 2-B | Forest-spotted Owlet | *Athene blewitti* | जंगली पिंगळा |
| 3 | Great Indian Bustard | *Choriotis nigriceps* | माळढोक |
| 4-A | Hawks | *Accipitridae* | ससाणा |
| 4-F | Indian Pied Hornbill | *Anthracoceros malabaricus* | कवड्या धनेश |
| 7 | Large Falcons | *Falco peregrinus, Falco biarmicus*<br>*and Falco chicuera* | बड़ा बाज |
| 7-A | Large Whistling Teal | *Dendrocygna bicolor* | बदक |
| 7-B | Lesser Florican | *Sypheotides indica* | तनमोर |
| 10-B | Osprey or Fish-eating | *Pandion haliatetus* | गरूड |

| Sr.no as per Schedule list given in the Act (अनुसूची नुसार क्रमांक) | English Name (इंग्रजी नाव) | Scientific Name (वैज्ञानिक नाव) | Marathi Name (मराठी नाव) |
|---|---|---|---|
| | Eagle | | |
| 11 | Peafowl | *Pavo cristatus* | मोर |
| 17-A | White Spoonbill | *Platalea leucorodia* | पांढरा चमच्या |
| 20 | Hill myna | *Gracula religiosa intermedia, Gracula religiosa peninsularis, Gracula religiosa indica* | पहाडी मैना |
| 24 | Vultures | *Gyps indicus, Gyps bengalensis, Gyps tennuirostris* | गिधाडे |
| Schedule - II (अनुसूची - II) | | | |
| Part I (भाग - I) | | | |
| 3-A | Bonnet macaque | *Macaca radiate* | वानर |
| 4-A | Common Langur | *Presbytis entellus* | हनुमान लंगूर/ लंगूर |
| 17-A | Rhesus macaque | *Macaca mulatta* | वानर |
| 22 | Wild dog or dhole | *Cuon alpinus* | सोन कुत्रा /जंगली कुत्रा |
| 24 | Chameleon | *Chameleon calcaratus* | सरडा रंग बदलणारा |
| 25 | Spiny-tailed Lizard/Sanda | *Uromastix hardwicki* | सांडा |

| Sr.no as per Schedule list given in the Act<br>(अनुसूची नुसार क्रमांक) | English Name<br>(इंग्रजी नाव) | Scientific Name<br>(वैज्ञानिक नाव) | Marathi Name<br>(मराठी नाव) |
|---|---|---|---|
| Part II (भाग - II) | | | |
| 1-A | Civets | All species of *Viverridae* | उद / म्हसण्या उद |
| 1-B | Common Fox | *Vulpes bengalensis* | खोकड |
| 1-C | Flying Squirrels | All species of genera *Bulopetes, Petaurista,*<br>*Pelomys* and *Eupetaurus* | उडती खार |
| 1-D | Giant Squirrels | *Ratufa indica* and *Ratufa bicolor* | शेकरू |
| 2-B | Jackal | *Canis aureus* | कोल्हा |
| 2-C | Jungle cat | *Felis chaus* | जंगली मांजर/ रान मांजर |
| 4 | Otters | *Luthra, L. perspicillata* | |
| 8 | Checkered keelback snake | *Xenochrophis piscatar* | दिवड |
| 9 | Dhaman or rat snake | *Ptyas mucosus* | धामण |
| 11 | Indian Cobras | All sub-species belonging to genus *Naja* | नाग |
| 12 | King Cobra | *Ophiophagus hannah* | किंग कोबरा |
| 14 | Russel's viper | *Vipera ruselli* | घोणस |
| 16 | Mongooses | All species of genus Herpestes | मुंगूस |

| Sr.no as per Schedule list given in the Act<br>(अनुसूची नुसार क्रमांक) | English Name<br>(इंग्रजी नाव) | Scientific Name<br>(वैज्ञानिक नाव) | Marathi Name<br>(मराठी नाव) |
|---|---|---|---|
| Schedule - III (अनुसूची - III) | | | |
| 2 | Barking deer or muntjac | *Muntiacus muntjak* | भेकर |
| 5 | Chital | *Axix axix* | चीतल |
| 12 | Hyaena | *Hyaena hyaena* | तरस |
| 14 | Nilgai | *Boselaphustrago camelus* | नीलगाय |
| 16 | Sambhar | *Cervus unicolor* | सांबर |
| 19 | Wild pig | *Sus scrofa* | रान डुक्कर |
| Schedule IV (अनुसूची - IV) | | | |
| 3-A | Five-striped palm squirrel | *Funambulus pennant* | खार |
| 4 | Hares | *Black Naped, Common Indian, Desert, Himalayan mouse hare* | ससा |
| 4-A | Hedge hog | *Hemiechinus auritus* | हेज होग |
| 4-E | Indian porcupine | *Hystrix indica* | साई / साळिंदर |
| 11 | Birds | Other than those which appear in other Schedules | अनुसूची I सोडून इतर सर्व पक्षी |
| 12 | Snakes | Other than those species listed in Sch,I, Pt.II; and Sch.II, Pt.II | अनुसूची-Iआणि अनुसूची-II,भाग-II सोडून इतर सर्व सांप |

| Sr.no as per Schedule list given in the Act (अनुसूची नुसार क्रमांक) | English Name (इंग्रजी नाव) | Scientific Name (वैज्ञानिक नाव) | Marathi Name (मराठी नाव) |
|---|---|---|---|
| 13 | Fresh Water Frogs | Rana*spp* | ताज्या पाण्यातील बेडूक |
| 15 | Tortoise | *Testudinidae, Tryonychidae* | कासव |
| Schedule - V (अनुसूची - V) | | | |
| 1 | Common crow | | कावळा |
| 3 | Fruit bats | | फळखाणारे वटवाघूळ |
| 5 | Mice | | उंदीर |
| 6 | Rats | | उंदीर |
| Schedule - VI (अनुसूची - VI) | | | |
| 1 | Beddome's cycad | *Cycas beddomei* | बेडोम्स सायकाड |
| 2 | Blue Vanda | *Vanda eoerulea* | ब्लू वांडा |
| 3 | Kuth | *Saussure acostus* | कुथ |
| 4 | Ladies slipper orchids | *Paphiopedilium spp* | लेडीज स्लीपर आर्किड |
| 5 | Pitcher plant | *Nepenthes khasiana* | पीचर प्लांट |
| 6 | Red Vanda | *Rananthera imschootiana* | रेड वांडा |

# अटक व शरणागती फॉर्म

**[प्रत्येक व्यक्तीसाठी वेगळा फॉर्म भरणे]**

1. P.O.R. नं.:
2. दिनांक: वेळ: जागा:
3. रेंज: डिव्हिजन:
4. अधिनियम: संबधित कलम:
5. कोर्ट: आरोपी कुठे दाखल केला गेला किंवा शरण आला:
6. आरोपीची माहिती:

| | |
|---|---|
| नाव | |
| वडिलांचे नाव | |
| टोपणनाव | 1. 2. 3. |
| राष्ट्रियत्व | |
| ओळखीचा दाखला | |
| दाखला प्रकार | |
| दाखला दिनांक | |
| घटना स्थळ | |
| इतर | |

7. पत्ता:
8. व्यवसाय:
9. ओळख पटवण्यासाठीच्या शरिरावरील खुणा:
10. आरोपी पकडण्यात आला ते ठिकाण:
11. खालील गोष्टी आरोपीकडे सापडल्या:

1. 2. 3.

12. अंगावरील कपडे:

13. अटकेची सूचना कुणाला सांगितली (नाव):

नातं:

14. आरोपीचे शारिरीक गुणधर्म:

| | | | |
|---|---|---|---|
| **लिंग** | | **केस** | |
| **जन्मदिनांक** | | **डोळे** | |
| **शरिर-बांधा** | | **व्रण** | |
| **उंची** | | **तीळ** | |
| **रंग** | | **टॅटू/गोंदणे** | |
| **ओळख खुणा** | | **भाषा** | |
| **व्यंग** | | **इतर** | |

15. गुन्ह्यासाठीची विशेष पद्धत:

16. अटकेच्या वेळी उपस्तीत असणाऱ्या साक्षीदरांचे वर्णन

| क्र. | नाव | पत्ता | स्थळ | वेळ | सही/ अंगठा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

17. पुन्हा आढळलेला गुन्हेगार:

| **गुन्ह्याचा प्रकार** | **पी. ओ. आर. नंबर** | **डिव्हिजन** | **रेंज** | **विवरण** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

18. दुसऱ्या गुन्ह्यांमधील सहभाग: पोलिस डिपार्टमेंट रिकॉर्ड:

19. इतर माहिती:

A. कसा रहातो- एकटा, कुटुंबा-बरोबर, हॉटेलमध्ये, छावणीमध्ये इतर

............................

B. शिक्षण:

C. उत्पन्न गट (दर महा):

| | | | | |
|---|---|---|---|---|
| < 500 | 500-1000 | 1000-3000 | 3000-5000 | 5000 > |

D. अधिकाऱ्याच्या नजरेतून किंवा माहितीनुसार आरोपीचे वर्णन:

| | | |
|---|---|---|
| **I.** | भितीदायक | हो/ नाही |
| **II.** | जामिनावर पूर्वी सुटका | हो/नाही |
| **III.** | सधारणपणे सशस्त्र | हो/नाही |
| **IV.** | साथीदारमबरोबर काम | हो/नाही |
| **V.** | सतत केलेल्या गुन्ह्यांचा इतिहास | आहे/नाही |
| **VI.** | जामिनावर सोडलं तर पळून जाईल | हो/नाही |
| **VII.** | जामिनावर सोडल्यास पुन्हा गुन्हा करेल | हो/नाही |

20. आरोपीला पकडून दिलेल्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी/ अंगठा:

| **अधिकारी** | **साक्षीदार** | **अटक झालेला आरोपी** |
|---|---|---|
| | | |

**पुरावा संकलन:**

**शक्य असेल तेव्हा, सर्व संग्रहित पुराव्याच्या वस्तूंवर (किंवा किमान पुराव्याच्या पॅकेजिंगवर) नंतर ओळखता येण्यासाठी कायमस्वरूपी पुढील खुणा करून ठेवाव्यात :**

**पीओआर क्र**


**वस्तू क्र.**

**अन्वेषकाचे नाव आणि सही**

**साक्षीदार व आरोपीचे नाव व सही**

**संग्रह केल्याचा दिनांक व वेळ**

**पुरावा संकलन खूणचिठ्ठी(टॅग)**



## पुरावा संकलन नोंदी

| | | |
|---|---|---|
| **पीओआर**<br><br>**क्र....................** | **परिक्षेत्र(रेंज)**<br><br>........................ | **डिव्हिजन**<br><br>........................ |
| **दिनांक**<br><br>............................ | **वेळ : आरंभ** ......................  **शेवट** ............................ | |
| **प्रभारी अधिकारी** .................................. | | |
| **अपराध घडल्याची जागा** .................................................. | | |
| **संकलक**<br><br>.......................... | **अनुसूचक**<br><br>......................... | **फोटोग्राफर**<br><br>......................... |
| **पुरावा खूणचिठ्ठी(टॅग)**<br><br>**क्र. आणि वर्णन** | **फोटोग्राफ आय.डी** | **शेरा** |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| **अन्वेषकाचे नाव आणि**<br><br>**सही** | **आरोपीचे नाव आणि सही** | **साक्षीदाराचे नाव आणि**<br><br>**सही** |

**Notes:**

**Notes:**

**Notes:**

**Notes:**

**Notes:**

Wildlife Conservation Trust
11th floor, Mafatlal Center,
Nariman Point, Mumbai - 400021,
Maharashtra, India.

☎ +91 22 4925 5555

Email: admin@wildlifeconservationtrust.org